

# हॉटेल व्यावसायिक कोविडनंतरच्या काळातही यशस्वी होतील : वेंगसरकर

## हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट असोसिएशनच्या पश्चिम विभागीय परिषदेला प्रारंभ

**नवीन नाशिक :** सन १९८३ च्या विश्वचषकाआधी कर्णधार कपिल देवला विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देताना आम्ही येथे जिंकण्यासाठी आलो आहोत असे उद्गार त्याने काढले होते. त्यानंतर अविश्वसनीय असा विजय भारताने मिळवला. त्याच प्रमाणे 'वी आर हिअर टू विन' या ब्रीदवाक्यावर विश्वास ठेऊन हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट व्यावसायिक कोविड नंतरच्या काळात देखील यशस्वी होतील असा विश्वास भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केला.

नाशिकमध्ये दि. ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाद्वारा आयोजित पश्चिम विभागीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. नाशिकमध्ये हॉटेल रॅडिसन ब्लू मध्ये आयोजित या परिषदेमध्ये पश्चिम भारतातील असंख्य हॉटेल व रेस्टॉरंट व्यावसायिक सहभागी झाले आहेत. उद्घाटन कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उद्घाटन सोहळ्यात भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, पर्यटन मंत्रालयाचे विभागीय संचालक डी. व्यंकटेशन, हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी, राकेश मेहरा व शेरी भाटिया हे उपस्थित होते.

परिषदेच्या संयोजन समितीचे प्रमुख डी. एस. अडवाणी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या प्रास्तविक पर भाषणात बोलतांना अध्यक्ष शेट्टी म्हणाले की कोविड महामारी मध्ये सर्वात जास्त नुकसान हॉटेल व रेस्टॉरंट उद्योगाचे झाले असून, आता हळूहळू हा व्यवसाय पूर्वपदावर येत आहे. भारताच्या जीडीपीमध्ये तसेच परकीय चलन कमाविण्यात या उद्योगाची महत्वाची भूमिका असून अनेक अन्य व्यवसायांना चालना तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार देणारा हा उदयोग आहे.

या तीन दिवसीय परिषदेमध्ये उद्योगापुढील आव्हाने व उपलब्ध संधी यावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असून, अन्य अनेक बाबींवर विचारमंथन होईल. हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट या उद्योगास शासकीय स्तरावरून मदतीची अपेक्षा असून, जीएसटी दरांमुळे दक्षिण आशियाई देशात भारतातील हॉटेल उद्योग सर्वात महाग असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे दर स्पर्धात्मक व्हावेत तसेच देशाचे मार्केटिंग परदेशात अधिक प्रभावीपणे सरकारने करावे अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.